# लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेणेकरीता जाहिरात.

**जाहिरात**

वाचा : शासन निर्णय क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३),दि.१० जून २०२५

या कार्यालयाच्या आस्थापनेवरील काम कार्यक्षमतेने होण्यासाठी वर्ग-१ व वर्ग-२ मधील सखोल अनुभव असणाऱ्या अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या / कर्मचाऱ्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने, अशी सेवा विवक्षित कामाकरिता १ वर्ष या कालावधीसाठी उपलब्ध करुन घेणेकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी, पात्र व इच्छूक उमेदवारांनी ' लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, नविन प्रशासन इमारत, पहिला मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२' येथे खालील पदासाठी **दिनांक १०/०९/२०२६** रोजी **दुपारी ०३.०० वाजता** थेट मुलाखतीस संबंधित मुळ कागदपत्र व अर्जासह उपस्थित रहावे.

| अ. क्र. | पदनाम (कराराधिष्ठित) | वयोमर्यादा | मासिक पारिश्रमिक | पद संख्या | पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ स्वीय सहायक (कराराधिष्ठित) | कमाल- ६५ वर्षे | शासन निर्णय क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७ /आस्थामं(का.१३), दि.१० जून २०२५ अन्वये देय मासिक पारिश्रमिक (शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे) | ०२ | १.महाराष्ट्र शासनाच्या शासकीय/निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था /न्यायालय इ. प्राधिकरणांमध्ये सुनावणीचे श्रुतलेखन घेऊन मराठी / इंग्रजी भाषेमध्ये आदेश तयार करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>२. वरिष्ठ स्वीय सहायक या पदाकरीता किमान वरिष्ठ स्वीय सहायक या पदावरुन सेवानिवृत्त असणे आवश्यक.<br>३. लघुलेखक (निवड श्रेणी) या पदाकरीता किमान लघुलेखक (निवड श्रेणी / उच्च श्रेणी) या पदावरुन सेवानिवृत्त असणे आवश्यक.<br>४. लघुलेखक (उच्च श्रेणी) या पदाकरीता किमान लघुलेखक (उच्च श्रेणी) या पदावरुन सेवानिवृत्त असणे आवश्यक.<br>५. लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदाकरीता किमान लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदावरुन सेवानिवृत्त असणे आवश्यक. |
| २. | लघुलेखक (निवड श्रेणी) (कराराधिष्ठित) | | | ०१ | |
| ३. | लघुलेखक (उच्च श्रेणी) (कराराधिष्ठित) | | | ०३ | |
| ४. | लघुलेखक (निम्न श्रेणी) (कराराधिष्ठित) | | | ०२ | |

सदरची सेवा निव्वळ विवक्षित कामासाठी कराराधिष्ठित पध्दतीने घेण्यात येणार असून सेवेचा कार्यकाळ १ वर्षाचा असेल. हा कार्याकाळ नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही. उक्त सेवेकरीता मासिक परिश्रमिक हे शासन निर्णयामध्ये नमूद परिशिष्ट-अ नुसार अदा करण्यात येईल. तसेच उक्त शासन निर्णयानुसार इच्छूक उमेदवारांची कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी. आवश्यकतेनुसार बदल करण्याचे सर्वाधिकार मा. लोक आयुक्त यांना राहतील.

( लोक आयुक्त यांचे मान्यतेने. )

अ.क्र. आस्था/१०१३/२०२६ — सही/-

दि.०३/०९/२०२६ — प्रबंधक

Pls visit our official web-site — लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य

https://lokayukta.maharashtra.gov.in